



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : १७१ ● पुणे ● मंगळवार, दि. २० मे २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


## पहिल्याच पावसात नऱ्हेतील रस्त्यांची दुरवस्था

**श्री. लक्ष्मण साबळे, निवासी संपादक**

● **नागरिक त्रस्त, प्रशासन गप्प**





**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुण्यातील सिंहगड रोड परिसरातील नऱ्हे गावात पहिल्याच पावसात रस्त्यांची दयनीय अवस्था समोर आली आहे. आज (१३ मे) रोजी पडलेल्या पहिल्या पावसातच रस्त्यांचे खड्डेमय रूप उघड झाले असून, अनेक ठिकाणी रस्ता उखडला आहे, डांबरीकरण निघून गेले आहे, तर काही ठिकाणी चिखल साचल्यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे.

नऱ्हे गावातील मुख्य रस्ता हा सिंहगड रस्त्याशी जोडणारा महत्त्वाचा मार्ग असून दररोज शेकडो वाहनांची ये-जा येथे होते. दोन दिवसांपूर्वीच या रस्त्याचे डागडुजी व डांबरीकरण करण्यात आल्याचा दावा स्थानिक हॉटेल व्यावसायिकांनी केला आहे. मात्र पहिल्याच पावसात रस्त्यांची दुर्दशा समोर आल्यामुळे वापरलेल्या साहित्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

नऱ्हे येथील बँक ऑफ महाराष्ट्र चौक ते शिंदे टी स्टॉलकडून हायवेकडे जाणारा रस्ता छोटा असून अक्षःरशा तिथे स्विमिंगपूल असावा असे चित्र आहे.

स्थानिक रहिवासी प्रचंड नाराज असून, त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत **'दै. आरंभ पर्व'कडे** संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत.

"दरवर्षी रस्ते बनवले जातात आणि पावसात पुन्हा उध्वस्त होतात. यामागे नक्कीच भ्रष्टाचार आहे," असे मत स्थानिक रहिवासी यांनी व्यक्त केले.

या भागातील कॉलेज, शाळा, कार्यालयात जाणाऱ्या नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी पाण्यामुळे खड्डे दिसत नाहीत, त्यामुळे अपघाताची शक्यता अधिक आहे.

प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. स्थानिक नगरसेवकांनी या रस्त्याचे उद्घाटन करताना "टिकाऊ आणि दर्जेदार काम" असल्याचे सांगितले होते, परंतु वास्तव वेगळेच चित्र दाखवत आहे. नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारीही दाखल केल्या असून, तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.

दरवर्षी लाखो रुपये खर्च होऊनही रस्ते इतक्या सहज खराब का होतात? या कामांमध्ये दोषी ठेकेदारांवर कारवाई का केली जात नाही? असा संतप्त सवाल नऱ्हे परिसरातील नागरिकांनी केला आहे.

> **दै. 'आरंभ पर्व'चे व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे म्हणाले की पुण्यासारख्या स्मार्ट सिटीचा दावा करणाऱ्या शहरात अशा प्रकारचे ढिसाळ काम, आणि त्यावर कोणतीही जबाबदारी घेणारे नसणे, हे प्रशासनासाठी काळजीचे आणि नागरिकांसाठी त्रासदायक बाब आहे. येत्या काळात आणखी पावसामुळे परिस्थिती बिकट होण्याची शक्यता लक्षात घेता, तातडीने उपाययोजना न झाल्यास नागरिकांचा उद्रेक अटळ आहे.**



## Corona Alert ! मे महिन्यात रुग्णसंख्येत वाढ, BMC अलर्ट मोडवर!

● **आरोग्य सेवा सज्ज – 'सेव्हन हिल्स' आणि 'कस्तुरबा' रुग्णालयात 112 खाटांची तयारी**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
पुन्हा एकदा कोरोनाचा सावट मुंबईवर! मे महिन्यात 53 नवे रुग्ण आढळून आल्याने मुंबई महानगरपालिकेला सतर्क व्हावे लागले आहे. दोन रुग्णांचा मृत्यू झाल्याचेही समोर आले असून, मृत्यूमुखी पडलेल्यांपैकी एकाला कर्करोग, तर दुसऱ्याला नेफ्रोटिक सिंड्रोम होता. हे दोघेही KEM हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते.

चीन, सिंगापूर, हाँगकाँग आणि इतर आशियाई देशांमध्ये कोरोनाची संख्या पुन्हा वाढू लागली आहे. त्याचा थेट परिणाम मुंबईवरही दिसू लागला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासन अलर्ट मोडवर आहे.

रुग्णसंख्येत वाढ झाल्यास अंधेरीतील सेव्हन हिल्स आणि चिंचपोकळीतील कस्तुरबा रुग्णालयात 112 बेड्स सज्ज ठेवण्यात आले आहेत. तसेच नागरिकांसाठी नवीन खबरदारी नियमावलीही जारी करण्यात आली आहे.

### BMC ची नवी नियमावली

- **लक्षणे असल्यास सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरा**
- **गर्दी टाळा, सोशल डिस्टन्सिंग पाळा**
- **साबण-पाण्याने हात वारंवार धुवा**
- **पोषक आहार आणि पुरेसा आराम घ्या**

## ठळक बातम्या




### पुणे युवासेना जिल्हाप्रमुखाच्या कारवर गोळीबार

**पुणे (आरंभ पर्व) : पुण्यात एक खळबळजनक घटना घडली आहे. शिवसेनेच्या युवासेना जिल्हाप्रमुख निलेश राजेंद्र घारे यांच्या वाहनावर गोळीबार झाला आहे. सोमवारी मध्यरात्री हा प्रकार घडला आहे. वारजे माळवाडी इथं हा प्रकार घडला. निलेश राजेंद्र घारे हे आपल्या घरी निघाले होते. दरम्यान, ते वारजे माळवाडी इथल्या गणपती माथा येथील आपल्या जनसंपर्क कार्यालयात आले यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी देखील होते. कार पार्क केल्यानंतर त्यांच्या कारच्या मागच्या दरवाजाच्या काचेवर दुचाकीवरुन आलेल्या दोघा अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. गोळीबारानंतर हल्लेखोर तात्काळ फरार झाले. वारजे पोलीस या घटनेचा तपास करत आहेत. निलेश घारे हे शिंदेंच्या शिवसेनेच्या युवासेना जिल्हाप्रमुख आहेत. या हल्ल्यामध्ये त्यांना कुठल्याही स्वरुपाची हानी झालेली नाही, ते सुखरुप आहेत अशी माहिती सुत्रांकडून कळते.**

### भारतात पुन्हा कोव्हिडची लाट येणार?

**पुणे (आरंभ पर्व) : चार वर्षांपूर्वी संपूर्ण जगभरात कोरोनाने धुमाकूळ घातला होता. कोरोनामुळे जग लॉकडाऊनच्या विळख्यात अडकलं होतं. या काळात अनेकांनी आपल्या जवळची माणसं गमावली, आजही कोरोना काळातील कटू आठवणी ताज्या आहेत. 2020 मध्ये आलेली कोरोनाची लाट 2022 मध्ये अटोक्यात आली. मात्र आता पुन्हा एकदा मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे काही देशांमध्ये कोरोनाने डोकं वर काढलं आहे.**

## उड्डाणपुलाखालील पार्किंगला 'ब्रेक'; धायरी फाटा येथील उड्डाणपुलाखालील पार्किंग बंद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
शहरातील उड्डाणपुलाखाली वाहन पार्किंग करणाऱ्या पुणेकरांना आता अडचणींचा सामना करावा लागणार आहे. महापालिकेच्या वाहतूक नियोजन विभागाने धायरी फाटा येथील उड्डाणपुलाखालील पार्किंग बंद केल्यानंतर, शहरातील इतर उड्डाणपुलांखालील पार्किंगवरही बंदी येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

धायरी फाटा परिसरातील स्व. आमदार रमेश वांजळे उड्डाणपुलाखाली अनेक वर्षांपासून दुचाकी पार्किंग सुरू होते. धायरी, नऱ्हे परिसरातील रहिवासी, तसेच हिंजवडी आयटी पार्कमध्ये काम करणारे तरुण आपली वाहने येथे लावून प्रवास करत असत. मात्र, काही स्थानिकांनी तक्रार केल्यानंतर पालिकेने थेट पार्किंग बंद करून नागरिकांची गैरसोय केली आहे.

वाहतूक नियोजन विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले, "उड्डाणपुलाखाली काही लोक मद्यपान करत असल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे पोलिसांसोबत पाहणी करून पार्किंग बंद करण्याचा निर्णय घेतला."

यावर अनेक नागरिकांचा संताप व्यक्त होत असून, "दारू पिणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी वाहनचालकांना शिक्षा देण्यात आली", असा आरोप होत आहे.

सध्या पुणे शहरात महापालिकेचे १८ पेक्षा अधिक उड्डाणपूल आहेत, आणि त्याखाली अनेक ठिकाणी दुचाकी व चारचाकी पार्किंग वापरली जात आहे. या जागांमुळे वाहतुकीला अडथळा होत नाही, तसेच वाहनेही सुरक्षित राहतात. मात्र, कुठल्याही पुलाखाली तक्रार आल्यास ती जागा पाहणी करून बंद केली जाऊ शकते, असे पावसकर यांनी स्पष्ट केले.

महापालिकेचे पार्किंग धोरण अनेक वर्षांपासून अंमलात न आल्यामुळे, शहरातील रस्त्यावरची पार्किंग अराजकतेच्या स्थितीत आहे. वाहनचालकांना नो-पार्किंगमध्ये गाडी लावल्यास दंड भरावा लागतो, तर उड्डाणपुलाखालील सुरक्षित जागा बंद केली जात असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. धायरी फाटा पार्किंग बंद केल्यानंतर शहरातील उर्वरित उड्डाणपुलांखालील पार्किंग देखील धोक्यात येण्याची चिन्हं आहेत. वाहतूक समस्या गंभीर होत असताना नागरिक महापालिकेकडून सुस्पष्ट आणि प्रभावी पार्किंग धोरणाची अपेक्षा करत आहेत.






# नाणेनिधीचा पाकला दणका



जम्मू-काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकला धडा शिकवला आणि त्याचे दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. या धामधुमीतच आयएमएफ म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकला एक अब्ज डॉलरचे कर्ज मंजूर केले होते. पण त्या कर्जाच्या कागदाची शाई वाळण्याआधीच नाणेनिधीने पाकला नव्या अटी लादल्या असून त्यामुळे पाकचा बेल आऊट कार्यक्रम धोक्यात आला आहे. भारतासाठी ही सुखद बातमी आहे. भारताबरोबरच्या तणावामुळे योजनेच्या वित्तीय, बाह्य आणि सुधारणा कार्यक्रमाला धोका होऊ शकतो. १७.६ ट्रिलियन रुपयांच्या नवीन अर्थसंकल्पाला संसदेची मान्यता आणि अन्य जाचक अटी पाकवर लादल्या आहेत. नाणेनिधीचे पाक प्रेम कुविख्यात आहे. पण यंदा मात्र नाणेनिधीकडून पाकला मदत मिळणार नाही आणि मिळाली तरी ती जाचक अटींमुळे असेल असा यात स्वागतार्ह बदल झाला आहे. अर्थात आयएमएफकडून पाकला मदत मिळूनही आतापर्यंत पाकची अर्थव्यवस्था सावरण्यास आणि पाकच्या अर्थव्यवस्थेला चांगले दिवस दाखवण्यास पाक अपयशी ठरला आहे.

पाकच्या आर्थिक समस्या काय आहेत आणि यातून तो कसा मार्ग काढतो यावर आम्हाला रस असण्याचे काहीही कारण नाही. पण पाक आर्थिक संकटात आहे आणि हे बेल आऊट पॅकेज मिळूनही तो आपल्या आर्थिक संकटातून येत नाही हे भारतासाठी मोलाचे आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वर्षानुवर्षे कर्ज मिळूनही पाक त्याचा उपयोग दहशतवाद्याना पोसण्यात करत आला आहे. अगदी १९४७ पासून पाक अस्तित्वात आल्यापासूनच पाकचे हे धोरण राहिले आहे आणि त्यामुळे त्याला कर्ज देण्यास भारताचा कायम विरोध राहिला आहे. कारण या कर्जाचा उपयोग अर्थात भारताच्या विरोधातच पाक करत आला आहे म्हणूनच इतकी गंगा आली तरी पाक कोरडा तो कोरडाच राहिला आहे. वारंवार कर्ज दिल्यानंतरही पाकच्या आर्थिक स्थितीत सुधारणा का होत नाही असा सवाल




भारताने अनेक वेळा उपस्थित केला आहे. पण याला उत्तर आहे की पाक तो सारा पैसा दहशतवाद्यांचे नेटवर्क आणि टेरर फंडिंगसाठी करतो. त्या पैशांचा विनियोग देशांतर्गत अर्थव्यवस्था सुधारण्याकडे होतच नाही. त्यामुळे पाकची ही अवस्था आहे.

पाकवर आता नाणेनिधीने नव्या अटी लादल्या असल्याने पाकचे श्वास घेणे मुश्कील झाले आहे. नाणेनिधीला पाकचे प्रेम खूपच आहे, पण पाकला तीही संघटना वर काढू शकत नाही. नाणेनिधीचा पाकला मदत करण्याचा निर्णय अत्यंत धोकादायक आहे आणि जागतिक मूल्यांच्या सुरक्षेसाठी अतिशय चुकीचा आहे असा इशारा देण्यात आला आहे. पाकिस्तान ३५ वर्षांपासून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून मदतीचा लाभ घेत आला आहे, पण तिचा उपयोग भारताविरोधात केला आहे आणि तरीही पाकला मदत करण्याचे नाणेनिधीचे धोरण चालूच राहिले आहे. वास्तविक नाणेनिधी किंवा संयुक्त राष्ट्रसंघ या संघटना या भारतविरोधी आहेत आणि त्यांचा दृष्टिकोन हा नेहमीच भारतविरोधी विशेषतः विकसनशील देशविरोधी राहिला आहे, हे आतापर्यंत अनेक वर्षे भारत सातत्याने सांगत आला आहे. पण या संघटनांच्या भूमिकेत बदल होत नाही. इतक्या त्या पाश्चात्य राष्ट्रांच्या अधीन झाल्या आहेत. पण आता मात्र पाकला चांगलाच धडा शिकवण्याचा निर्धार नाणेनिधीने केला आहे आणि पाकवर ज्या नव्या अटी लादल्या आहेत त्यामुळे पाकचे कंबरडे पुरते मोडून पडणार आहे. या संघटना कितीही पाक प्रेमी असल्या तरीही त्यांना पाक या आपल्या लाडक्या अपत्याला आता दूर करावेच लागणार आहे अन्यथा या संघटनाच कालबाह्य ठरण्याचा धोका आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर आणि भारताचे सैनिक पाकला धडा शिकवत असतानाही नाणेनिधीने पाकला १.४ अब्ज डॉलरची मदत करण्याचा निर्णय घेतला होता आणि तोही ऐन युद्ध भरात असताना. पण आता नाणेनिधीला उपरती झाली आहे आणि त्याने पाकला नव्या अटी लादल्या आहेत. अर्थात नाणेनिधीला उपरती झाली म्हणून लगेच आपण त्याचे कौतुक करायला नको. कारण पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकला जबरदस्त उत्तर दिले असतानाही आणि पाकचे एअरबेस उद्ध्वस्त केले असतानाही आयएमएफने पाकला १२ हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले. ज्या दिवशी पाकला हे कर्ज मंजूर केले त्याच दिवशी पाकने केलेले देशविघातक कृत्याचा पंचनामा भारताने आंतरराष्ट्रीय समुदायासमोर मांडला होता. नाणेनिधी दुटप्पी आहेच हे त्यातून सिद्ध होत आहे. पण त्याचबरोबर या नव्या अटीमुळे पाकला आणखी एक दणका मिळाला आहे आणि त्यातून तो बाहेर पडू शकणार नाही याची व्यवस्था करण्यात आली आहे. पाकला १९५८ पासून बेल आऊट पॅकेज मिळण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून पाकला ४४ अब्ज डॉलरचे पॅकेज मिळाले आहे. त्याचा उपयोग पाकने दहशतवाद्यांना पोसण्यात आणि भारताविरोधात कट कारस्थाने करण्यात केला आहे. त्यामुळे पाकला इतकी मदत करणारा नाणेनिधी हाही भारतविरोधीच आहे. आता पाकने ज्या नव्या अटी लादल्या आहेत त्यातून पाक सावरणे अवघड आहे, कारण त्या अटींमध्ये पाकची अर्थव्यवस्था सुधारण्याचा समावेश आहे, पण उनाड मुलाला जशी अभ्यासाची अट नको वाटते तसेच पाकचे आहे. त्याला केवळ दहशतवाद्यांना पोसणे आणि इतर देशांविरोधात कारवाया करण्यासाठी त्यांना उचकवणे यातच रस आहे. त्यामुळे पाकला निधी देण्याचा निर्णय मुळात चुकीच्या वेळी घेतला आहे. त्याविरुद्ध जोरदार मत प्रदर्शन करण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरपासून आयएमएफने अनेक अटी पाकवर लादल्या आहेत त्यामुळे पाक जरा-जर्जर झाला आहे. पण पाकवर आयएमएफने संरक्षण खर्चावर नियंत्रण आणि दहशतवादाला मदत न करणे या अटींचा समावेश नाही. नेमक्या याचाच फायदा आतापर्यंत पाक घेत आला आहे. पण आता तसे तो करू शकणार नाही. आयएमएफनेही आता पाकचे दहशतवादाबद्दल वाटणारे प्रेम लक्षात घेऊन त्या देशाला धडा शिकवला पाहिजे. पाकवर अटी लादतानाच आयएमएफनेही आपण कालबाह्य ठरण्याचा धोका आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

## कारागृहातील कैद्यांच्या कुटुंबीयांसाठी सायबेज फाउंडेशनचा संवेदनशील प्रकल्प

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सायबेज सॉफ्टवेअर प्रा. लि. च्या कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी योजना (सीएसआर) गटाने, सायबेज फाउंडेशनतर्फे पुण्यातील ऐतिहासिक येरवडा मध्यवर्ती कारागृहात कैद्यांना भेट देणाऱ्या त्यांच्या कुटुंबीयांसाठी एक नवीन आणि सुसज्ज प्रतीक्षालयाचे लोकार्पण केले. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने वागवले जावे तसेच विशेषतः जे तुरुंगवासाला सामोरे जात आहेत त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम सुविधा प्रदान करणे हा सायबेज फाउंडेशनचा महत्त्वाचा हेतू आहे.

हे प्रतीक्षालय समाजापासून दूर कोठडीत असलेल्या व्यक्तींप्रती असलेल्या दृष्टिकोनाला बदलण्यासाठी तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी योग्य सुविधा पोहचवण्यासाठी राबवण्यात येत आहे. लहान मूल असलेल्या मातांपासून ते लांब प्रवास करून येणाऱ्या वृद्ध पालकांपर्यंत, सर्व कुटुंबियांना सुरक्षित आणि स्वच्छ, सन्मानजनक सुविधा प्रदान करण्यात येईल. ज्यामुळे त्यांना भावनिक आणि शारीरिक संघर्षाला तोंड देणे सुकर होईल.




"प्रतीक्षालय केवळ विटा आणि सिमेंटचा ढाचा नाही, तर ती सदभावना आणि सहवेदना यातून उभारलेली जागा आहे. अनेकदा खेड्यापाड्यांतून आलेली कुटुंबे आपल्या जवळच्या व्यक्तीला भेटण्यासाठी लांबचा, थकणारा प्रवास करतात. वर्षानुवर्षे ही कुटुंबे उन्हात, पावसात आणि समाजाच्या तिरस्कारपूर्ण नजरेत उभं राहून आपल्या व्यक्तीची वाट बघतात. या उपक्रमातून आम्ही या कुटुंबियांना एवढंच सांगू इच्छितो की, आम्हाला तुमची काळजी आहे आणि तुम्हालाही सन्मान मिळायला हवा.' सायबेज फाउंडेशनमध्ये आमचे प्रयत्न नेहमी वास्तवतेला धरून, आणि परिणाम साधणारे असतात. हा प्रकल्प या तत्त्वज्ञानाचं एक प्रतिबिंब आहे. जिथे सहसा कोणी लक्ष देत नाही, अशा रिकाम्या जागा भरून काढण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत." असे सायबेज फाउंडेशनच्या प्रमुख व सायबेज सॉफ्टवेअरच्या संचालक मंडळाच्या सदस्य, रितू नथानी यांनी सांगितले. या नव्या प्रतीक्षा कक्षामध्ये १००० हून अधिक लोकांसाठी आसनव्यवस्था, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, अल्पोपहाराची सुविधा, मातांसाठी स्तनपान कक्ष, मुलाखत कक्षापर्यंत सुरक्षित मार्ग, कायदेशीर सल्ला कक्ष, तसेच अद्ययावत नोंदणी विभाग यांचा समावेश आहे. सायबेज फाउंडेशनने हा प्रकल्प पूर्णपणे स्वतःच्या सीएसआर कार्यक्रमाअंतर्गत विकसित केला असून, यामध्ये कारागृह प्रशासन आणि स्थानिक सरकारी यंत्रणांसोबत जवळून समन्वय साधण्यात आला आहे.

येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री. सुनील ढमाळ यांनी या उपक्रमाचे स्वागत करताना म्हटले, "इथे येणाऱ्या कुटुंबांमध्ये अशी अनेक माणसं असतात, जी भावनिक वेदना बाळगून असतात, जी कोणालाही दिसत नाही. ही सुविधा, भेटायला येणाऱ्या कुटुंबांच्या अनुभवामध्ये मोठा फरक घडवून आणेल. आम्ही सायबेज फाउंडेशनचे या अर्थपूर्ण सहवेदनेबद्दल मन:पूर्वक आभार मानतो." इतिहास आणि परंपरांनी समृद्ध असलेले येरवडा कारागृह आता एका अशा प्रकल्पाचे साक्षीदार झाले आहे, जे मानवी दृष्टिकोनातून पायाभूत सुविधांचं भविष्य दर्शवतं. ही जागा म्हणजे भावना आणि कृती यांचा सुंदर संगम आहे. दरवर्षी अंदाजे ३.५ लाखांहून अधिक नागरिक या प्रतीक्षालयाचा लाभ घेतील.

## जागतिक उच्च रक्तदाब दिन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनियंत्रित उच्च रक्तदाबामुळे स्ट्रोक,हृदयविकाराचा झटका आणि मुत्रपिंडाचे नुकसान होण्याची शक्यता वाढतेच याशिवाय दृष्टीवरही याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. यासाठी रक्तदाबाचे निदान झालेल्या व्यक्तींनी नियमित डोळ्यांची तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचे मत तज्ञांनी व्यक्त केले. याबाबत अधिक माहिती देताना एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटलच्या वैद्यकीय संचालिका डॉ.सुचेता कुलकर्णी म्हणाल्या की, उच्च रक्तदाबामुळे रेटिनल व्हॅस्क्युलर ऑक्लुजनची (आरव्हीओ) जोखीम वाढू शकते, या स्थितीमध्ये नसांमधून नेत्रपटलाकडे जाणारा रक्तप्रवाह खंडित होतो. यावर उपचार न केल्यास दृष्टी धूसर होऊ शकतो किंवा दृष्टी जाण्याचा धोका असतो. काही व्यक्ती डॉक्टरांचा

- **रक्तदाब नियंत्रित ठेवल्यामुळे रेटिनल व्हॅस्क्युलर ऑक्लुजनचा धोका कमी होण्यास मदत**

सल्ला न घेता रक्तदाबाची औषधे घेणे बंद करतात,ज्यामुळे परिस्थिती अजून बिघडू शकते. अधिकाधिक तरूणांना उच्च रक्तदाबाचे निदान होत आहे ही सध्याची वस्तुस्थिती असून एक मोठी चिंतेची बाब ठरत आहे. डॉ.कुलकर्णी पुढे म्हणाल्या की, उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी वर्षातून किमान एकदा डोळ्यांची तपासणी करावी,ज्यामध्ये डॉक्टरांकडून डोळ्याच्या पडद्यामधील कोणत्याही असामान्यता तपासता येऊ शकतील. ज्या व्यक्तींना उच्च रक्तदाब तसेच मधुमेह आहे.

## सप्तसूर वॉरियर्स संघाने पटकावले डीपीएल २०२५चे विजेतेपद

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

डी एस के विश्व प्रीमियर लीग २०२५ (डीपीएल २०२५) पर्व २ ही क्रिकेट ची स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडली. या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नगरसेविका अश्विनी किशोर पोकळे व किशोर दत्तात्रय पोकळे आणि डी एस के विश्व स्पोर्ट्स असोसिएशन यांनी केले दिनांक २६ एप्रिल पासून सुरु झालेल्या या स्पर्धेचा ११ मे रोजी अंतिम सामना झाला. डी एस के विश्व आणि परिसरातील एकूण १६ सोसायटीने यामध्ये सहभाग घेतला होता. ज्यामध्ये वरून पवन , वसुधा , रोहिणी, चंद्रमा, भास्करा, सप्तसूर, मेघमल्हार, गणेश नक्षत्रम, स्टार सिटी , जे के हिल पार्क, मृगवर्षा आणि व्हेनिस इ. संघांनी सहभाग नोंदवला. सप्तसूर या संघाने या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. चंद्रमा संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.



सर्वोत्तम गोलंदाज गिरीश पैठणकर, सर्वोत्तम क्षेत्ररक्षक मंगेश देशपांडे, ग्रीन डॉट बॉलर रोहन तायडे, सर्वोत्तम फलंदाज आणि मालिकावीर म्हणून सचिन हगवणे यांची निवड करण्यात आली.

तसेच या स्पर्धेत एकूण १२४८ डॉट बॉल टाकण्यात आले त्यामुळे डी एस के विश्व परिसरात १२४८ झाडे लावण्याचे काम करण्यात येणार आहे.

स्पर्धेचे नियोजन डी एस के विश्व स्पोर्ट्स असोसिएशन च्या वतीने अध्यक्ष तेजस पवनीकर, उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, खजिनदार महेश पुराणिक, कार्याध्यक्ष लहुकुमार राऊत, सचिव प्रथमेश कुलकर्णी, प्रसाद परदेशी, सागर किनगी, गिरीश पैठणकर, श्रेयस कुलकर्णी, आदिनाथ ढवळे, नितीन शिरसीकर, गौरव लिंबगावकर, संजय माडचेट्टी, अन्वय भुतकर, अमित मोघे आणि सतीश फाटे यांनी केले. तर त्यास सौजन्य म्हणून नगरसेविका अश्विनीताई किशोर पोकळे आणि किशोरभाऊ दत्तात्रय पोकळे यांनी मौल्यवान साथ दिली.


## सुर्यदत्त नॅशनल स्कूलचा सीबीएसई दहावी व बारावीचा निकाल १०० टक्के

### सीबीएसईच्या दहावी, बारावी परीक्षेत सूर्यदत्त नॅशनल स्कुलचे घवघवीत यश

- **सलग नवव्या वर्षी दहावीचा निकाल १०० टक्के, तर सहाव्या वर्षी बारावीचा निकाल १०० टक्के; प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले अभिनंदन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) वतीने घेण्यात आलेल्या दहावी व बारावीच्या परीक्षेत सूर्यदत्त नॅशनल स्कूलचा निकाल सलग नवव्या वर्षी १०० टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत शाळेसाठी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. दहावीच्या परीक्षेत अरात्रिका प्रशांत उमाप (९२.४० टक्के), मृण्मयी सुधीर देशमुख (८९.६० टक्के), तर अवनीश मंदार जोशी (८६.२० टक्के) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.




बारावीच्या परीक्षेत समीर दीपक दातार ९७ टक्के मिळवत प्रथम आला. उत्कर्ष संदीप पाटील याने ९६.६० टक्के मिळवून द्वितीय, तर आरुष मकरंद सातारकर व जयश्री रे यांनी ९५.६० टक्के गुण मिळवून संयुक्तपणे तिसरा क्रमांक मिळवला. २९ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. उत्कर्ष पाटील याने रसायनशास्त्रात, तर समीर दातार याने आयपी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

**दहावीचा अभ्यास करताना सूर्यदत्त संस्थेतील शिक्षकांनी खूप चांगले मार्गदर्शन केले. सर्वच विषय अतिशय सोप्या पद्धतीने शिकवले गेले. सराव करून घेतला. अनेक मान्यवरांना ऐकता आले. आधुनिक शिक्षण पद्धती आणि नियमित तयारी करून घेतल्याने आम्हाला अभ्यास करताना अडचणी आल्या नाहीत.**
**- अरात्रिका प्रशांत उमाप**




**आयसीएसई, आयबी, एसएससी, सेमी इंग्रजी आणि महापालिका शाळा अशा पार्श्वभूमीतून हे विद्यार्थी आले होते. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षक व इतर स्टाफने खूप मेहनत घेतली होती. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याने त्यांच्या मेहनतीला चांगले फळ मिळाले आहे. व्यक्तिगत आढावा, प्रोत्साहन, मार्गदर्शन यासह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर शाळेने भर दिला. त्याच जोरावर शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील ऑलिम्पियाड्समध्ये विजेतेपद पटकावले आहे.**
**- प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, संस्थापक अध्यक्ष, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन**

**सूर्यदत्त संस्थेतील प्रसन्न वातावरण अभ्यासाला पूरक ठरले. येथील सर्व व्यवस्थापन, शिक्षक व अन्य लोकांकडून खूप चांगले मार्गदर्शन मिळाले. विविध उपक्रमांतून अभ्यासाबरोबरच व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत झाली. बारावीच्या परीक्षेतील यशात माझे पालक, शिक्षक यांचाही मोलाचा वाटा आहे.**
**- उत्कर्ष संदीप पाटील**

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा संजय चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, सूर्यदत्त नॅशनल स्कुलच्या संचालक शीला ओका यांनी विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशासाठी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## थोडक्यात




### मातृत्वाबद्दल आदर, सन्मान राखावा

- **बिग विंग होंडा तर्फे विशेष बाईक राईडचे आयोजन**

पुणे (आरंभ पर्व) : बिग विंग होंडा पुणे तर्फे मातृदिन तसेच भारतीय सैनिकाला अभिवादन करण्यात आले, या निमित्ताने महिला व मुलांसाठी विशेष बाईक राईड आयोजित करण्यात आली होती. शनिवार वाडा येथून ही बाईक राईट सुरू झाली, ती होंडा बिगविंग जे एम रोड, येथील शोरूम ला भेट देऊन ती पुढे बाणेर येथील बिग विंग होंडा येथे पोहोचले. मातृत्वाबद्दल आदर, सन्मान ठेवणे हा मुख्य उद्देश या पाठीमागे होता. आयोजित बाईक राईटला महिला, पुरुषांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. त्याबरोबर बाणेर येथील बिग विंग होंडा शोरूम येथे रक्तदान राबविण्यात आले. समाजातील रक्ताची गरज लक्षात घेता ती गरज काही प्रमाणात कमी करण्याकरिता बिग बिग होंडा बाणेर तर्फे उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये महिला व पुरुषांचा सक्रिय सहभाग पाहायला मिळाला. बिग विंग होंडा हे पुण्याचे दर्जेदार सेवा देणारे शोरूम असून होंडाच्या सर्व बाईक्स, बुलेट, एडवेंचर बाइक्स अशा विविध बाईक विक्रीसाठी उपलब्ध आहेत. कार्यक्रमाच्या संयोजनामध्ये रवी गारगोटे, संतोष कुंडगीर, विपुल उमादे, मोनिका लोणकर तसेच सहभागी यश लडकत, वेंकटेश अर्दडे, प्रसाद पाटुकले निखिल बनकर, पूजा, स्नेहा, सुधा, उमेश, अक्षय शर्मा तसेच बाइकर्स सुरभी सोमण, कृपा लडकत, मानशी ठक्कर तसेच सर्व रायडर्स आदी होते.

### वडगावच्या ज्ञानसाधना शाळेचा याही वर्षी शंभर टक्के निकाल

वडगाव (आरंभ पर्व) : वडगाव बुद्रुक तुकाईनगर येथील केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्था संचलित ज्ञानसाधना विद्यामंदिर इंग्रजी व मराठी माध्यम या शाळेच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. गेल्या आठ वर्षापासून शाळेची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली केली आहे. इंग्रजी माध्यमाचा अजय दाहिया याने ९३ टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान पटकावला, अभिषेक पटेल ८८.२० टक्के तर पियुष राय ८८ टक्के गुण मिळवून दुसरे व तिसरे स्थान पटकावले आहे. मराठी माध्यमातून ८० टक्के गुण मिळवून पायल गुरव हिने प्रथम क्रमांक मिळवला तर सानिका भिलारे ७७.४० , महालक्ष्मी थोपटे ७२.६० टक्के मिळवून दुसऱ्या व तिसऱ्या स्थानी राहिले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक हरिदास चरवड, सचिव सौ.पूनम चरवड, उपाध्यक्ष केदार जाधव, मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका वैशाली किजबिले, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका राजश्री बोबडे, शाळा समन्वयक नंदकिशोर गोसावी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



### कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या कार्याचे मूल्यमापन होणे गरजेचे : डॉ. भोळे

पुणे (आरंभ पर्व) : शासनाच्या विविध क्षेत्रात अनेक राजपत्रित अधिकारी, कनिष्ठ अधिकारी राष्ट्राच्या व समाजाच्या हितासाठी, भल्यासाठी, समर्पित भावनेने विविध उपक्रम राबवत असतात. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असतात. शासकीय राजपत्रित अधिकारी व कनिष्ठ अधिकारी यांच्या कार्याचे मूल्यमापन होण्यासाठी पद्मश्री डॉ.मनीभाई देसाई प्रतिष्ठानच्या वतीने गेली ३५ वर्षे पासून शासकीय कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करीत आहे. हक्क व कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कार्याचे मूल्यमापन व्हावे, यासाठी कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या कार्याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे असे मत प्रवचनकार हिंदू रत्न डॉ. रवींद्र भोळे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ.मणी भाई देसाई प्रतिष्ठान उरुळी कांचन यांनी येथे प्रतिनिधी जवळ विचार व्यक्त केले.

## थोडक्यात



### पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : पुणे - सोलापूर महामार्गावरील कदमवाकवस्ती ग्रामपंचायत हद्दीतील एका पेट्रोल पंपावर डिझेल भरण्यासाठी गेलेल्या चारचाकी गाडीने अचानक पेट घेतला .पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. दुपारी दोनच्या सुमारास ही घटना घडली . हडपसर येथील सातव नगर येथून इसत्याक सय्यद व इमरान सय्यद हे दोघे चारचाकी गाडी क्रमांक एम.एच.१२ ई.टी. ९६०४ या गाडीत बसून नगर याठिकाणी नातेवाईकांना भेटण्यासाठी निघाले होते. पुणे दिशेकडून सोलापूरकडे जात असताना कदम वाकवस्ती ग्रामपंचायत हद्दीतील एका पेट्रोल पंपावर डिझेल भरण्यासाठी गेले असताना अचानक गाडीच्या बोनटमधून धूर येत असल्याचे कार चालकाला दिसून आले.कार चालकाने प्रसंगावधान राखत गाडीतून खाली उतरला, तोपर्यंत गाडीने मोठा पेट घेतला होता. पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन गाडीला लागलेली आग विझविली.



### लाईट हाऊसच्या प्रशिक्षणार्थी आणि टीमसोबत मुक्ताचे आरोग्य सत्र संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : पर्वती पायथ्याजवळील जणता वसाहतीमधील लाईट हाऊस कम्युनिटीच्या प्रशिक्षणार्थींसोबत आज मुक्ताच्या वतीने मानसिक आरोग्यावरील विशेष सत्र घेण्यात आले. या वेळी लाईट हाऊस कम्युनिटीच्या मा. अल्पिता आणि मा. आनंती जगताप उपस्थित होत्या. सत्रामध्ये मुक्ताचे कम्युनिटी हेल्थ असोसिएट मा. मुकेश सावकारे यांनी मानसिक आरोग्याचे शरीरावर होणारे परिणाम समजावून सांगितले. तसेच मासिक पाळी दरम्यान महिलांनी कोणती काळजी घ्यावी आणि या काळात पसरलेल्या गैरसमजांवरही त्यांनी प्रकाश टाकला. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून उपस्थितांच्या शंका दूर केल्या. मुकेश सावकारे यांनी मैत्रिणींशी मोकळेपणाने संवाद साधण्याचे महत्त्व सांगताना, “आपण जेव्हा मैत्रिणींशी बोलतो तेव्हा ते चुगल्या करणे वाटते, पण त्या बोलण्यातून कुणाचे नुकसान होत नसेल तर त्यात काहीच वावगे नाही,” असे नमूद केले. तसेच रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात दररोज १०-१५ मिनिटे स्वतःसाठी घेऊन मनाला आनंदी ठेवण्याचा सल्ला दिला. या सत्रात मुक्ताचे दुसरे कम्युनिटी हेल्थ असोसिएट मा. ऋषिकेश भंगारे यांनी स्वतःची काळजी घेणे आणि गरज असल्यास मदत मागणे गैर नाही, असे स्पष्ट करत ‘मुक्ता मानसिक आरोग्य हेल्पलाईन’ची माहिती दिली आणि गरज पडल्यास कॉल करण्याचे आवाहन केले. सत्रानंतर प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारले. “मी ठरवते काय करायचे पण करत नाही, काय करावे?” या प्रश्नावर कामांचे छोटे टप्पे करून पाहण्याचा सल्ला देण्यात आला आणि तरीही अडचण वाटल्यास मुक्ताच्या हेल्पलाईनवर 788 788 9882 कॉल करण्याचे सुचवले. सत्राच्या यशस्वी आयोजनासाठी लाईट हाऊस कम्युनिटीच्या मा. मृण्मयी यांच्यासह संपूर्ण टीमने सहकार्य केले.

# झिरोपेस्टिसाइड रेसिड्यू बदाम

## बदाम श्रेणीतील एक नावीन्यपूर्ण शोध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या काही वर्षांत, अधिकाधिक लोक जे खाद्य खातात त्याबद्दल जागरूक झाले आहेत. बदलत असलेल्या जीवनशैली आणि विकसित होत असलेल्या ग्राहकांच्या आवश्यकतांमुळे, बदाम श्रेणीमध्ये एक नवकल्पना घडली आहे. नुकतेच लाँच केलेले बोर्जेस झिरो पेस्टिसाइड रेसिड्यू (ZPR) बदाम ग्राहकांमध्ये एक स्वच्छ आणि विचारपूर्वक खाण्यासाठी एक पसंतीची निवड बनत आहेत.

बोर्जेस झिरो पेस्टिसाइड रेसिड्यू (ZPR) बदामांमध्ये, पेस्टिसाइड रेसिड्यू 0.01 mg/kg किंवा 0.01 ppm पेक्षा कमी असतात, जो एक स्वतंत्र युरोपियन लॅबद्वारे प्रमाणित मानक आहे. ग्राहक हे प्रमाणपत्र पाहण्यासाठी पॅकवरील QR कोड स्कॅन करून आणि बॅच नंबर टाकून हे सत्यापित करू शकतात.

बोर्जेस इंडिया ने भारतीय बाजारात झिरो पेस्टिसाइड रेसिड्यू (ZPR) बदामांची ओळख करून दिली, जे ग्राहकांच्या बदलत्या आवश्यकतांना पूर्ण करण्यासाठी आहे. स्वच्छ आणि पौष्टिक अन्नाची वाढती मागणी लक्षात घेता, बोर्जेस ZPR बदाम या बदलाला उत्तम प्रकारे तोंड देऊ शकतात, भारतीय बाजारात एक अनोखा स्नॅकिंग पर्याय प्रदान करत आहेत. हे बदाम स्पॅनिश उत्पत्तीचे आहेत आणि त्यांच्या नैसर्गिक गोड चवीसाठी ओळखले जातात. याव्यतिरिक्त, हे बदाम भाजलेले, कुरकुरीत आणि समृद्ध चवीचे आहेत.

बोर्जेस ही एक संस्था आहे जी ग्राहकांसाठी महत्त्वाचे असलेले उत्पादने आणण्यासाठी समर्पित आहे—ही उत्पादने गुणवत्ता, आरोग्य आणि टिकाव याला प्राधान्य देतात. ZPR बदामांसह उत्पादनेची श्रेणी, व्यक्तींना त्यांच्या दैनंदिन जीवनात विचारपूर्वक आणि आरोग्यदायी निवडी करण्यास मदत करण्यासाठी तयार केली आहे.




बोर्जेस गर्वाने असे सुनिश्चित करते की त्यांच्या उत्पादनांची गुणवत्ता उच्चतम, पोषक आणि स्वच्छ असावी, जी संपूर्ण जगभरातील आरोग्यदायी, सोयीस्कर अन्नाच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद देऊ शकते.

चला, बोर्जेस झिरो पेस्टिसाइड रेसिड्यू (ZPR) बदामांच्या लोकप्रियतेला चालना देणाऱ्या काही मुख्य घटकांचा अभ्यास करूया, जे त्याला विचारपूर्वक खाणे आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीसाठी एक स्वच्छ निवड बनवतात.

बोर्जेस ZPR बदाम त्यांच्या पौष्टिक समृद्धतेसाठी ओळखले जातात. हे ग्लूटन मुक्त आहेत, उच्च फायबर्स आहेत आणि प्रथिनांचा चांगला स्रोत आहेत. त्यात झिरो कोलेस्ट्रॉल आणि झिरो ट्रान्स फॅट्स आहेत; ज्यामुळे ते दिवसभरात कधीही आरोग्यदायीपणे वापरता येतात.

ZPR बदामांसारख्या उत्पादनांची वाढती मागणी नैसर्गिक आणि स्वच्छ उत्पादने कडे ग्राहकांच्या व्यापक कलांमुळे आहे. भारतीय बाजारात उपलब्ध असलेले बोर्जेस ZPR बदाम अत्यंत पारदर्शकता आणि विश्वासाची हमी देतात. उत्पादनाची प्रामाणिकता तपासण्यासाठी, ग्राहक पॅकच्या मागे दिलेला QR कोड स्कॅन करून झिरो पेस्टिसाइड रेसिड्यू प्रमाणपत्र डाउनलोड करू शकतात.



## आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त आठवडाभर विशेष कार्यक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्वराज हॉस्पिटल,लोणी येथे जागतिक परिचारिका दिनानिमित्त आठवडाभर विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.हा कार्यक्रम विश्वराज हॉस्पिटलच्या कार्यकारी संचालिका डॉ.आदिती कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. 'आपल्या परिचारिका,आपले भविष्य- परिचरिकांची काळजी घेणे म्हणजे अर्थव्यवस्थेला बळकटी देणे' या संकल्पनेअंतर्गत आयोजित या उपक्रमाचे उद्घाटन विश्वराज हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ.सुजीत कुमार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.या कार्यक्रमांमध्ये नर्सिंग सक्षमीकरण या विषयावर प्रा.डॉ.शिवचरण गंधार यांचे संवादात्मक सत्र आयोजित करण्यात आले होते. त्याचबरोबर हृदयरोग तज्ञ डॉ.सुरज इंगोले,स्त्रीरोग तज्ञ डॉ.सुषमा कुंजीर,ईमर्जन्सी आणि ट्रॉमा युनिटचे प्रमुख डॉ.सनिष गार्डन, सहाय्यक वैद्यकीय संचालक सचिन कातकाडे यांनी आरोग्यसेवा क्षेत्रात परिचारिकांचे महत्त्व यावर आपले मनोगत व्यक्त केले. याशिवाय परिचारिकांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांचा खाद्य महोत्सव,सांस्कृतिक कार्यक्रम आणि पारितोषिक वितरण समारंभ पार पडला,अशी माहिती विश्वराज हॉस्पिटलच्या नर्सिंग विभागाच्या प्रमुख सारिका भोसले यांनी दिली.

## धुवाधार पावसाने पुलाचा भराव वाहून गेला

### वाड्या-वस्त्यांचा संपर्क तुटला



● कमान (ता. खेड) येथील पाटीलवस्ती आणि बारापाटी परिसरात पुलाचा भराव वाहून गेला आहे. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरूनगर) ●

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या वळवाच्या जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतीसह रस्ते व घरांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

शनिवार (दि. १०) पासून तालुक्यात ठिकठिकाणी वादळी व विजांसह पाऊस होत आहे. रविवारी (दि. ११) कडूस व चास परिसरात, सोमवारी वाडा व खेडच्या पूर्व भागात, तर मंगळवारी (दि. १३) राजगुरुनगरसह चास, कडूस, रेटवडी, किवळे आदी भागांत वादळी अवकाळी पावसाचा जोर होता. खेड तालुक्याच्या काही भागात व राजगुरुनगर परिसरात अवकाळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले. ढगफुटी झाल्याप्रमाणे अवघ्या तासाभरात सुमारे ३८ मि.मी. पावसाची नोंद झाली. तर ओढ्या नाल्यांना पूर आले होते. कमान गावातील पाटीलवस्तीकडे जाणाऱ्या राजगुरुनगर-वाडा रस्त्यालगतच्या मोरीपुलावरील भराव पुराच्या पाण्यात वाहून गेला असून त्यामुळे येथील वाड्या-वस्त्यांचा संपर्क तुटला आहे.

किवळे येथे वाऱ्यामुळे पत्र्याची शेड उडाली असून, दत्तात्रय बंडू कडूसकर यांच्या जनावरांच्या गोठ्याचे नुकसान झाले आहे. रेटवडी परिसरात अनेक झाडे पडली आहेत. चासजवळील बारापाटी येथे मातीचा बंधारा वाहून गेला असून, तीन घरांची कौले उडाली आहेत. सोमवारी (दि.१९) पश्चिम भागाला धूवांधार पावसाने झोडपले असून भोरगीरी पासून चासच्या आखरवाडीपर्यंत सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला.




# १५० कोटीच्या घोटाळ्याची 'सीबीआय' चौकशी करावी

## शेखर चरेगावकर यांच्यासह संचालक मंडळावर त्वरित गुन्हा दाखल करून अटक करावी

**--- (दै. आरंभ पर्व)**

राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची मागणी; कारवाई न केल्यास सहकार आयुक्तांना घेराव घालणार

पुणे: फलटण येथील यशवंत बँकेत १५० कोटीपेक्षा अधिक रुपयांचा घोटाळा झाला आहे. यात बँकेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांचा प्रमुख सहभाग आहे. चरेगावकर यांनी वेगवेगळ्या बोगस कंपन्यांमार्फत कराड येथील अनेक लोकांची फसवणूक केलेली आहे. ऑडिट रिपोर्टमध्येही गैरकारभार दिसून येतो आहे. त्यामुळे या घोटाळ्याची केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सीबीआय) विभागामार्गात चौकशी करून चरेगांवकर यांच्यासह दोषी संचालक मंडळावर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केली. या प्रकरणाची दखल घेऊन सहकार आयुक्तांनी त्वरित कारवाई करावी, अन्यथा सहकार आयुक्त कार्यालयाला बँकेचे ठेवीदार व कर्जदारांना घेऊन घेराव आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी दिला. यावेळी फसवणूक झालेले बँकेचे ठेवीदार व कर्जदार यांच्यासह ॲड. निलेश जाधव, गणेश पवार, एस. डी. कुलकर्णी उपस्थित होते. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "चरेगांवकर यांनी अनेकांच्या नावावर बोगस कर्ज काढली असून, अनेकांना त्यांच्या अपरोक्षपणे जामीनदार केले आहे. ही कर्जे थकीत आहेत. कर्जाचे पैसे हस्तेपरहस्ते बोगस कंपन्यांमध्ये वळवलेले आहे. सर्व आर्थिक व्यवहारांमध्ये स्वतःचा व कुटुंबाचा फायदा केला आहे. त्याचप्रमाणे बँकेमधील पैशाचा विनियोग स्वतःच्या खाजगी मालमत्ता घेण्यासाठी केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. पीडित ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळाले पाहिजेत.""यशवंत सहकारी बँकेचे अनेक ठेवीदार यांनी माझी भेट घेऊन बँकेच्या घोटाळ्याची कागदपत्रे दिली. आर्थिक व्यवहारात झालेल्या अफरातफरीमुळे लोकांना त्यांचे हक्काचे पैसे मिळणे अशक्य झाले आहे.

### सहकार खात्याकडून कारवाई नाही; मलाही धमकी

**मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "बँकेच्या २३० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. परंतु मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने ठेवीदारांच्या ठेवी अडचणीत आल्या आहेत. राज्याच्या सहकार खात्याकडे बँकेतील अनियमिततेबाबत तीन अहवाल आले आहे. सहकार खात्याने मोठी अनियमितता असूनही कायदेशीर कारवाई अद्याप केली नाही. सहकार खाते, पोलीस खाते यांनी अद्याप कारवाई का केली नाही हाही प्रश्न आहे. माझ्या संपर्कात ज्या व्यक्ती आहेत, त्यांना शेखर चरेगावकर यांचे भाऊ शार्दूल यांच्याकडून धमकावले जात आहे. तसेच सहकार खात्यातील अधिकारी यांच्यावरही दबाव टाकला जात आहे. मलादेखील 'तुम्ही याप्रकरणात गप्प बसा; अन्यथा तुमचे गेल्यावेळी तिकीट कापले, तसे पुढेही बघून घेऊ' अशी धमकी दिली जाते. हा प्रकार अतिशय गंभीर असून, पक्षाचे वरिष्ठ याची दखल घेतील, असा विश्वास आहे. केंद्रीय सहकार विभागाकडेही याबाबत तक्रार केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांना भेटून याबाबत तक्रार करणार आहे. गुन्हेगार असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. कारण सामान्य नागरिकाचे पैसे यात लुबाडण्यात आले आहे. भाजपमधील पदाच्या आडून कोणी असा गैरकारभार करत असेल, तर त्याची पक्षातील वरिष्ठ गंभीर दखल घेतील.**

# इन्फोसिस फाऊंडेशनकडून ॲवॉर्ड्सच्या चौथ्या आवृत्तीची घोषणा

## भारतातील सामाजिक बदलांच्या प्रवर्तकांच्या मदत व सक्षमीकरणासाठी २ कोटी रूपयांची वचनबद्धता

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इन्फोसिस फाऊंडेशन या इन्फोसिसच्या परोपकार आणि सीएसआर विभागाने आपल्या आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्सच्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली आहे. भारतात सामाजिक नवचैतन्याला चालना देण्याप्रति आपली वचनबद्धता स्पष्ट करताना इन्फोसिस फाऊंडेशन या पुरस्कारांत सहभागी होण्यासाठी देशभरातील नवप्रवर्तक आणि सामाजिक उद्योजकांना आमंत्रित करत आहे. आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्स २०२५ चे उद्दिष्ट भारतातील वंचित समुदायांवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडण्याची क्षमता असलेल्या अद्वितीय तंत्रज्ञान-आधारित उपायांचा विकास करणाऱ्या व्यक्ती, संघटना, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक उपक्रमांचा गौरव करून पारितोषिक देण्याचा आहे. इन्फोसिस फाउंडेशन प्रत्येक विजेत्याला ५० लाख रुपयांपर्यंत बक्षीस देण्याचे वचन देते. त्याची एकूण बक्षीस रक्कम २ कोटी रुपयांची आहे.

आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्स २०२५ मध्ये शिक्षण, आरोग्यसेवा ,पर्यावरणीय शाश्वतता या तीन श्रेणींमध्ये अर्ज १५ जून पर्यंत स्वीकारले जातील. १८ वर्षे वयावरील भारतात राहणाऱ्या नागरिकांसाठी प्रवेशिका खुल्या आहेत. सहभागी व्हिडिओजच्या स्वरूपात आपल्या कामाचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या प्रवेशिका दाखल करू शकतात. ते आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्सच्या वेबसाइटवर अपलोड केले जातील. आणि प्रवेशिका पूर्णपणे कार्यरत प्रोटोटाइप किंवा पूर्ण झालेला प्रकल्प असावा. ती फक्त एक संकल्पना, कल्पना किंवा माहिती नसावी.

“इन्फोसिस फाउंडेशनमध्ये आम्ही जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समुदायांच्या प्रगतीसाठी नावीन्यपूर्णतेच्या शक्तीवर विश्वास ठेवतो. आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्सच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, आरोग्यसेवा आणि पर्यावरणीय शाश्वततेमध्ये प्रभावी उपाययोजना देणाऱ्या व्यक्तींची ओळख समाजाला करून देण्यासाठी आणि त्यांना पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहोत. भारतातील सामाजिक नवसंशोधकांना पुढे येण्यास त्यांचे विचार व्यक्त करण्यास आणि एक खरा बदल घडवून आणण्यास प्रोत्साहित करतो. या चौथ्या आवृत्तीसह आम्ही प्रत्येकासाठी पुढील संधी निर्माण करण्यासाठी मानवी क्षमता वाढविण्याच्या आमच्या उद्देशाला पुढे नेण्याचे उद्दिष्ट ठेवतो,” असे इन्फोसिस फाउंडेशनचे विश्वस्त सुमित विरमणी म्हणाले.

Infosys Foundation

- **खऱ्या समस्या: खऱ्या सामाजिक आव्हानांवर प्रत्यक्ष उपाययोजनांद्वारे उपाय काढणे.**
- **प्रभावी उपाययोजना: प्रभावी, मूल्यमापनयोग्य आणि शाश्वत उपाययोजना.**
- **वचनबद्ध संस्थापक: एक अर्थपूर्ण बदल घडवण्यासाठी वचनबद्ध असलेले विचारी नवप्रवर्तक.**
- **आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्स, सादरीकरण प्रक्रिया आणि परीक्षणाचे निकष यांच्याबाबत अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या: Infosys Foundation | Aarohan Social Innovation Awards**

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज .. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व

गाव तेथे वार्ताहर

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात

वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

* पात्रता *
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# थोडक्यात

## मार्व्हल रिॲल्टर्सकडून प्रख्यात बोट क्लब रोडवर मार्व्हल रिबेरा सादर



पुणे (आरंभ पर्व) : मार्व्हल रिॲल्टर्स ही लक्झरी रिअल इस्टेटमधील प्रतिष्ठित कंपनी आता शहरातील सर्वात प्रख्यात स्थळ बोट क्लब रोडवर बांधकाम पूर्ण होण्याच्या जवळ असलेले अल्ट्रा-एक्सक्लुसिव्ह निवासी विकास मार्व्हल रिबेरा आहे. आधुनिक रॉयल्टीसाठी अर्बन पॅलेस म्हणून डिझाइन करण्यात आलेल्या रिबेरामध्ये कालातीत आकर्षकतेसह सर्वोत्तम डिझाइन आणि अत्याधुनिक ऑटोमशेनचे संयोजन आहे, ज्यामधून अत्याधुनिक, अनुभवात्मक राहणीमानामधील अग्रणी म्हणून मार्व्हलचे स्थान अधिक दृढ होत आहे. या लाँचबाबत मत व्यक्त करत मार्व्हल रिॲल्टर्सचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वजीत झवर म्हणाले, मार्व्हलमध्ये आम्ही सदनिकांचे बांधकाम करण्यासह वारसा निर्माण करतो. रिबेरासह आम्ही समकालीन शाही राहणीमानाची मोहकता देणारे आणि आधुनिक तंत्रज्ञान, विस्तृत लेआऊट्स व नदीकाठचा शांतमय परिसर यांचे उत्तम संयोजन असलेले निवास डिझाइन करत या दृष्टिकोनाला अधिक पुढे घेऊन गेलो आहोत. बोट क्लब रोड पुण्यातील सर्वात प्रख्यात स्थळांपैकी एक आहे आणि रिबेरामधून आजच्या सूक्ष्मदश गृहमालकांच्या महत्त्वाकांक्षा दिसून येतात, जे गोपनीयता, प्रतिष्ठा आणि पॅनोरॅमिक लक्झरी मिळवण्याचा प्रयत्न करतात. हे फक्त निवास नाहीत तर प्राचीन भव्यता आणि आधुनिक आरामदायीपणाचे दुर्मिळ संयोजन आहेत. लक्झरीला प्राधान्य दिल्या जाणाऱ्या बाजारपेठेत रिबेरा नवीन मापदंड स्थापित करते. जून 2025 मध्ये सदनिकांचा ताबा देण्यास सज्ज असलेले रिबेरा शहरामध्ये आकर्षकता, सर्वोत्तम वातावरण आणि अत्याधुनिकता घेऊन येते. 2,500 चौरस फूटांपासून 10,000 चौरस फूटांपर्यंत चटई क्षेत्र (कारपेट एरिया) असलेल्या सदनिकांसह हा प्रकल्प पुण्यातील सर्वात महागड्या खाजगी निवसींपैकी एक आहे; रिबेरा त्याच्या आकारमानासह स्थायी भावनेसाठी देखील ओळखले जाते. हे लक्झरी निवास असण्यासोबत भावी वारसा आहेत, जे लोकेशनपेक्षा वारशाला महत्त्व देणाऱ्यांसाठी डिझाइन करण्यात आले आहेत. मार्व्हल रिबेरा 3.5, 4 व 5 बीएचके अपार्टमेंट्स आणि पेंटहाऊस ऑफर करते, प्रत्येक अपार्टमेंट मोकळेपणा, वातानुकूलित वातावरण, नयनरम्य दृश्ये आणि दुप्पट उंची असलेले खाजगी टेरेस प्रदान करण्यासाठी काळजीपूर्वक डिझाइन करण्यात आले आहे. आतील भागात इम्पोर्टेड संगमरवरी फ्लोअरिंग, सागवान लाकडाचे दरवाजे, बिल्ट-इन अप्लायन्सेससह ब्रँडेड मॉड्यूलर किचन आणि निवडक युनिट्समध्ये जकूझी व स्टीम रूमसह मास्टर बाथरूम आहेत.

## जीवे मारण्याची धमकी देऊन खंडणीची मागणी

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : कंपनीत उपहारगृह चालवणाऱ्या व्यक्तीला धमकाऊन खंडणीची मागणी केली, तसेच उपहारगृह चालवायचे असल्यास दर महिन्याला २५ हजार रुपयांची खंडणी रक्कम द्यावी लागेल, अन्यथा जीवे मारीन अशी धमकी देण्यात आली. कन्हेरसर (ता. खेड) येथील एसईझेड परिसरात एका कंपनीच्या फाटकाजवळ मंगळवारी (दि. १३) दुपारी बाराच्या सुमारास हा प्रकार घडला. बेकायदा जमाव जमवुन खंडणी मागितल्याप्रकरणी राहुल शंकर मकाळे, कमलेश मुकुंद दौंडकर, सुरज दगडू हजारे आणि मनोज शंकर मकाळे (सर्व रा. कन्हेरसर, ता. खेड) यांच्या विरोधात खेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत उपहारगृह चालक रोशन छबुराव काळे (वय ३८, रा. सेक्टर २८, गंगानगर, निगडी, पुणे) यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, चार जणांनी त्यांना जीवे मारण्याची धमकी देत २५ हजार रुपये खंडणीची मागणी केली. रोशन काळे यांचा इंडस्ट्रियल उपहारगृह चालविण्याचा व्यवसाय आहे. मंगळवारी सकाळी त्यांचा टेम्पो चालक अनिल वाळुंज एका कंपनीत कामगारांचे जेवण घेऊन जात असताना संशयीत आरोपी राहुल मकाळे, कमलेश दौंडकर, सुरज हजारे आणि मनोज मकाळे यांनी फाटकाच्या बाहेर टेम्पो अडवला. त्यांनी चालकाला जेवण घेऊन जाण्यास प्रतिबंध केला. यानंतर रोशन काळे आणि त्यांची पत्नी घटनास्थळी गेले असता, आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत धमकी दिली. "उपहारगृहाची ऑर्डर रद्द करा, पुन्हा कंपनीत जेवण घेऊन येऊ नका, नाहीतर तुम्हाला मारून टाकू," असे म्हणत त्यांनी दहशत निर्माण केली. तसेच, व्यवसाय चालू ठेवायचा असेल तर दरमहा २५ हजार रुपये खंडणी द्यावी लागेल, अशी मागणी केली. या प्रकरणी रोशन काळे यांनी खेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गोडगे पुढील तपास करत आहेत. पोलिसांनी आरोपींविरुद्ध खंडणी, धमकी आणि दहशत निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# आयुशक्तीचे पुनावळेमध्ये नवीन आयुर्वेदिक आऊटलेटचे उद्घाटन

## महाराष्ट्रातील ७वी फ्रँचायझी भव्य उद्घाटनादरम्यान लाँच करण्यात आली



पुणे (दै. आरंभ पर्व)

आयुशक्ती या जगभरातील आघाडीच्या आयुर्वेदिक आरोग्य केंद्राने आपले स्थानिक विस्तारीकरण सुरू ठेवले आहे. कंपनीने या आठवड्यात पिंपरी-चिंचवडचे झपाट्याने विकसित होत असलेले उपनगर पुनावळे मध्ये नवीन आऊटलेटचे उद्घाटन करण्यात केले.

पुनावळे येथील कोयटे वस्ती रोडवरील गायकवाड नगरातील लॉन्गिट्यूड बिल्डिंग येथे स्थित ही नवीनतम फ्रँचायझी आयुषशक्तीचे महाराष्ट्रातील 7 वे आउटलेट आहे. या नवीन लाँचसह, आयुषशक्तीचे आता महाराष्ट्रातील प्रमुख प्रदेशांमध्ये 29 आउटलेट आहेत, ज्यापैकी 15 फ्रँचायझी आहेत.

नवीन आऊटलेट रूग्णांना तोच सिद्ध वेद सराव आणि आयुर्वेदिक सल्लामसलत व उपचार देत राहिल. या केंद्रामध्ये 2 थेरपी कक्ष, 2 सल्लामसलत कक्ष आणि 2 प्रशिक्षित आयुर्वेदिक तज्ञ आहेत, जे सह-संस्थापक डॉ. स्मिता पंकज नारम आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णा पंकज नारम यांच्याअंतर्गत प्रशिक्षित आहेत. या केंद्रामध्ये रूग्णांसाठी पॅण्ट्री आणि आरामदायी प्रतिक्षा कक्ष देखील आहे.


वैद्य स्मिता नारम प्राचीन आयुर्वेदिक प्रॅक्टिशनर आणि डिटॉक्स पंचकर्म तज्ञ आहेत. त्या आयुर्वेदिक सरावाच्या त्यांच्या कौटुंबिक परंपरेमधील वैद्यची पाचवी पिढी आहेत आणि वारसा पुढे घेऊन जात आहेत. त्यांचा या पृथ्वीवरील व्यक्तींच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा, व्यक्तींना प्रमाणित प्राचीन उपायांच्या अनुभवाच्या माध्यमातून आनंदी, आरोग्यदायी व सुंदर ठेवण्याचा दृष्टिकोन आहे.

हे आऊटलेट सेवा व उपचारांची व्यापक श्रेणी देईल, जसे डीप पल्स रीडिंग (नाडी परीक्षा), पंचकर्म, स्टीम, मसाज, डिटॉक्सिफिकेशन उपचार, गुणकारी औषधी उपचार, सानुकूल आहार योजना, मार्मा (आयुर्वेदिक प्रेशर पॉइण्ट) तंत्र आणि इतर.

या लाँचप्रसंगी आयुशक्ती टीम सदस्य व फ्रँचायझी मालकांसह आयुशक्तीची मुख्य टीम उपस्थित होती. नवीन फ्रँचायझीच्या लाँचबाबत मत व्यक्त करत आयुशक्तीच्या सह-संस्थापक डॉ. स्मिता नारम म्हणाल्या, "मला अल्पावधीत महाराष्ट्रामध्ये आणखी एक आऊटलेट लाँच करण्याचा आनंद होत आहे. आम्ही येथील ग्राहकांना सेवा देण्यास आणि त्यांच्यावर उपचार करण्यास उत्सुक आहोत. पृथ्वीवरील व्यक्तींच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या आणि त्यांना आरोग्यदायी जीवन जगण्यास मदत करण्याच्या दृष्टिकोनासह आम्ही विस्तारीकरण करत आहोत.

त्या पुढे म्हणाल्या, "गेल्या वर्षभरात आम्हाला मिळालेला प्रतिसाद अद्भुत आहे, ज्यामुळे आम्ही भारतभरात नवीन आऊटलेट्स सुरू करण्यास उत्सुक आहोत.

सामुदायिक आरोग्यामध्ये दीर्घकालीन परिवर्तन घडवून आणण्याच्या मिशनसह 1987 मध्ये आयुशक्ती लाँच करण्यात आली. मास्टर हीलर स्वगय डॉक्टर पंकज नारम आणि त्यांच्या पत्नी स्मिता नारम यांनी सहयोगाने या कंपनीची स्थापना केली. सध्या, कंपनी नऊ देशांमध्ये कार्यरत असून एक दशलक्षहून अधिक ग्राहकांचा उपचार करत आहे, आधुनिक काळातील आयुर्वेदिक पंचकर्म (डिटॉक्स) उपचार व औषधे देत आहे.



# राजगुरुनगर परिसराला अवकाळी पावसाने झोडपले

राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)

- तासाभरात ३८ मि.मी. पावसाची नोंद

खेड तालुक्याच्या काही भागात व राजगुरुनगर परिसरात अवकाळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले. तासाभरात सुमारे ३८ मि.मी. पावसाची नोंद झाली. दुपारी साडेबारा वाजता राजगुरुनगर परिसरात ढगफुटीसारखा तुफान पाऊस पडला. तासाभराच्या पावसाने परिसरातल्या ओढ्यानाल्यांना पूर आला.

सकाळपासून वातावरणात मोठी उष्णता होती. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास काही मिनिटात आकाशात काळेकुट्ट ढग जमा झाले आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. पहिल्या अर्ध्या तासात तर पावसाचा जोर इतका भयानक होता की जवळचेही काही दिसत नव्हते. रस्त्यावरची वाहने दिवे लावून संथपणे चालली होती. रस्त्यांवर माणूस दिसत नव्हते.

राजगुरुनगरच्या रस्त्यांना ओढ्याचे स्वरूप आले. त्यामुळे जनजीवन विस्कळित झाले. सुमारे तासभर हा मुसळधार पाऊस पडत होता. पाऊस उघडल्यावर वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली होती.

या पावसाने उन्हाळी भाजीपाला आणि बाजरीच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र हा पाऊस खरीप हंगामापूर्वी मशागतीच्या कामांना चांगला आहे, यामुळे शेतकरी समाधानी आहे.

# गुंफण स्मरणिकेचे श्री श्री श्री दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या शुभहस्ते प्रकाशन

**गुरुनाथ तिरपणकर**




इचलकरंजी (दै. आरंभ पर्व)

गुंफण या स्मरणिकेचे कोष्टी समाजाच्या हम्पीपिठाचे अधिपती श्री श्री श्री दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या शुभहस्ते, महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाने केलेल्या आर्थिक मदतीने व श्री देवांग समाज रजिस्टर इचलकरंजी यांनी बांधलेल्या कैलासवासी कोठुजी कुंभारे यांच्या वस्तीगृह उद्घाटन प्रसंगात दिमाखदारपणे प्रकाशन झाले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना स्वामीजींनी कोष्टी समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाचा प्रसार, आर्थिक प्रगती व समाजाची एकता होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. प्रारंभी देवान समाजाच्या वतीने त्यांची पाद्यपूजा करण्यात आली. या स्मरनिकेत महाराष्ट्र कोष्टी समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष श्री प्रकाशराव सातपुते यांनी गेल्या पाच वर्षात संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील कोष्टी समाज बांधवांच्या चौंडेश्वरी व बनशंकरी मंदिरांना, तसेच संघटनांना दिलेल्या भेटी. त्यांच्याशी साधलेला संवाद. तसेच 75 व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून व दयानंदपूरी स्वामींच्या वाढदिवसाचे निमित्ताने राज्यातील 75 चौंडेश्वरी मंदिरात स्वामीना दीर्घायुष्य लाभो यासाठी देवीला एकाच वेळी केलेला अभिषेक तसेच समाज संघटना बांधणीसाठी व उन्नतीसाठी आलेले विचारवंतांचे प्रबोधनपर लेख इ. गोष्टींचा उल्लेख आहे. त्यामुळे ही स्मरणिका समाज बांधवांना नक्कीच उपयोगी पडेल.

युवा संघटनेची पुनर्रचना करण्यात आली असून या समारंभात नवीन कार्याध्यक्ष म्हणून इचलकरंजी येथील युवा नेतृत्व श्री जयेश बुगड यांना धुरा देण्यात आली ,तसेच युवा उपाध्यक्ष विजय मुसळे ,महेश ढवळे हेमंत आमणे ,सचिन लोले प्रफ्फूल निवळ यांची निवड करून कांहीना , नियुक्तीपत्रे स्वामीजींच्या हस्ते देण्यात आली .या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष श्री प्रकाशराव सातपुते, मॅनेजिंग ट्रस्टी अंकुशराव उकार्डे, निमंत्रित ट्रस्टी, श्री राजेंद्र ढवळे, उपाध्यक्ष उदयराव बुगड, सल्लागार विश्वनाथ मुसळे, श्री विठ्ठलराव डाके, महासचिव रामचंद्र निमणकर, सचिव मिलिंद कांबळे , महिला कार्याध्यक्ष सौ स्मिता सातपुते, तसेच सौ स्मिता बगड,सौ संगीता धूत्रे ,श्रीमती प्रीती बुगड,सौ दीपा सातपुते, श्रीमती सुशीला फाटक ,सौ उज्वला कबाडे ,सौ ऐश्वर्या सातपुते तसेचअखिल भारतीय कोष्टी कोष्टी फेडरेशनचे अध्यक्ष श्री अरूणराव वरुडे, नारायण उंटवाले, दिलीप भंडारे ,शितल सातपुते विलासराव पाडळे, एस, एस अनिगोळ ,डी,एम कस्तुरे ,राजेंद्र चांगले, प्रमोद मुसळे, कुमार कबाडे मधुकर वरुटे ,आनंदा साखरे, उत्तम म्हेत्रे, राहुल सातपुते इत्यादी मान्यवर तसेच समाज बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवउद्योजकांना दुबईत उत्पादने निर्यातीसाठी मार्गदर्शन करणार : धनंजय दातार



पुणे (दै. आरंभ पर्व)

मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी महाराष्ट्रातील नवउद्योजकांची उत्पादने दुबईसह संयुक्त अरब अमिरातीत निर्यात करण्यासाठी मदतीची तयारी दाखवली आहे. दुबईच्या उंबरठ्यावरुन जागतिक बाजारपेठेत व्यवसाय वाढवण्यास इच्छुक असलेल्यांना मनापासून मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. सोलापूर येथील आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक व्यावसायिकांच्या शिष्टमंडळाने नुकतीच धनंजय दातार यांची येथे भेट घेऊन त्यांच्यापुढे सोलापूरच्या शेंगा चटणी, ज्वारीची कडक भाकरी, उत्कृष्ट दर्जाची ज्वारी, तांदूळ व डाळी अशा कृषी उत्पादनांचे सादरीकरण केले. एका बॅग उत्पादकाने नावीन्यपूर्ण पॅकेजिंग सोल्यूशन्सही सादर केली. दातार यांनी या सर्वांच्या गुणवत्तेचे कौतुक केले व काही उत्पादने आपल्या अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स समूहातर्फे खरेदी करण्याची तयारी ही दाखवली.

भारतातून दुबईत उत्पादने निर्यात करण्यासाठीची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, कायदेशीर तरतुदी, दर्जा व पॅकेजिंगसंबंधी नियम तसेच व्यवसायाचे विपणन करताना घ्यायची काळजी अशा विविध पैलूंवर दातार यांनी या शिष्टमंडळाला मार्गदर्शन केले. ते म्हणाले, भारतातून आखाती देशांत विशेषतः संयुक्त अरब अमिरातीत होणारी निर्यात मुख्यतः सागरी वाहतुकीद्वारे होते आणि ती स्वस्त असते. मात्र या प्रवासाला साधारणतः २० दिवस लागत असल्याने शेल्फ लाईफ अत्यल्प असलेली नाशवंत उत्पादने विचारात घेऊ नयेत. किमान सहा महिने ते वर्षभर टिकणारी उत्पादने निवडावीत. आम्ही आमच्या सुपर स्टोअर्सच्या साखळीद्वारे आखाती बाजारपेठेत शुद्ध, स्वच्छ व अस्सल उत्पादने पुरवतो.

हल्ली सेंद्रीय उत्पादनांवर ग्राहकांचा विशेष भर आहे. उत्पादनांचे पॅकेजिंग सुरक्षित व टॅम्परप्रूफ असावे. आम्ही आमच्या पिकॉक ब्रँडअंतर्गत अलिकडे पौष्टिक खपली गहू सादर केला. त्याला येथील ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात रंगमंचीय कला महत्वपूर्ण

## प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे मत; पद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांच्या बासरीवादनाने उपस्थित मंत्रमुग्ध

**पंडित मजुमदार यांनी बासरीवादन करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सानिया पाटणकर यांनी आपल्या बहारदार आवाजात 'हे सुरानो चंद्र व्हा' नाट्यपद आणि संस्कृत गणेश वंदना सादर केली. रोणू व आनंदी या मुजुमदार दाम्पत्याने भक्तीरचना सादर केली. सानिया पाटणकर, आर्कि. सुजाता कोडग यांनीही व्यवसायातील विविध पैलूंवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. सूत्रसंचालन शोभा कुलकर्णी यांनी केले. नरेंद्र कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, संचालक प्रशांत पितालिया यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.**



पुणे (दै. आरंभ पर्व)

"गुरु केवळ शैक्षणिक ज्ञान देत नाही, तर आयुष्याला दिशा देण्याचे काम करत असतो. आपल्यातील सर्वोत्तम गुण हेरून विद्यार्थ्यांना घडवण्याचे सामर्थ्य गुरुकडे असते. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुचे स्थान अलौकिक आहे. आपण समर्पित भावनेने काम करत राहावे, तसेच विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक गॅजेटस् पासून दूर राहून छंद जोपासावेत. बासरीप्रमाणे भारतीय शास्त्रीय संगीताच्या रियाजामुळे विद्यार्थ्यांचा बुद्धी विकास सहज शक्य होऊन सर्वांगीण विकास साधला जाऊ शकेल," असे मत ज्येष्ठ बासरीवादक पद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांनी व्यक्त केले. भारतीय संगीत ही अध्यात्माची वाट आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुजुमदार बोलत होते. संगीत आणि गुरुकुल परंपरा यांचा संगम म्हणजे आपल्या संस्कृतीचे वैभव आहे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनतर्फे पंडित रोणू मजुमदार यांना 'सूर्यदत्त सूर्यभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शिक्षण, कला, समाजसेवा आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो. गायिका आनंदी रोणू मजुमदार, शास्त्रीय गायिका सानिया पाटणकर आणि प्रसिद्ध आर्किटेक्ट सुजाता कोडग यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय स्त्रीशक्ती पुरस्कार' देण्यात आला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया व सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी रंगमंचीय कला महत्वाच्या भूमिका निभावतात. नाटक, नृत्य, गायन आणि अभिनय यांसारख्या कलांमुळे केवळ सर्जनशीलता वाढत नाही, तर नेतृत्वगुण, संवाद कौशल्य आणि निर्णयक्षमता सुधारते. रंगमंच हा शिक्षणाचा एक अविभाज्य भाग असायला हवा. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर कलाक्षेत्रातही प्रगती करावी, याकरिता सूर्यदत्तमध्ये कला, तसेच सर्वच क्षेत्रातील दिग्गजांना, युवा कलाकारांना निमंत्रित केले जाते. त्यांच्याशी संवादाचे आयोजन केले जाते. मोबाइल, टीव्हीपासून अंतर ठेवत उच्च शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी छंद जोपासावेत आणि परिपूर्ण विकास घडवावा, यासाठी सूर्यदत्त सदैव प्रयोगशील राहील."

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.